**समाज विकास विभाग**
पुणे महानगरपालिका
दि.२५/०३/२०२६

# प्रेस नोट

पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग व युनायटेड वे बेंगलुरू यांच्या संयुक्त विद्यमाने स्टेट स्ट्रीट यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पोन्सिबिलिटी (CSR) अंतर्गत पुणे महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींसाठी तंत्रज्ञान आधारित सहाय्यक साधनांच्या वितरणाचा कार्यक्रम दि.२५/०३/२०२६ रोजी पुणे महानगरपालिका नवीन इमारत, तळ मजला, शिवाजीनगर या ठिकाणी आयोजित करणेत आला होता.

युनायटेड वे बेंगलुरू व पुणे महानगरपालिकेच्या समन्वयाने पुणे महानगरपालिका हद्दीतील पात्र दिव्यांग व्यक्तींना निओ मोशन-इलेक्ट्रिक व्हीलचेअर- ७ नग, वाडिया महाविद्यालयातील अंध विद्यार्थ्यांसाठी SHG स्मार्ट चष्मे-१३ नग, वाडिया महाविद्यालय आणि स्वाभिमान स्पेशल एज्युकेशन स्कूल, खडकी यांच्यासाठी प्रत्येकी १ किबो डिव्हाइस (AI वाचन सहाय्यक) या आधुनिक उपकरणांचे वाटप करणेत आले.

सदर कार्यक्रमासाठी मा. मंजुषा नागपुरे, महापौर, पुणे, मा. नवल किशोर राम, महापालिका आयुक्त, मा. पवनित कौर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज), श्रीमती आशा राऊत, उप आयुक्त, समाज विकास विभाग, श्री. रामदास चव्हाण, मुख्य समाज विकास अधिकारी , श्री. प्रवीण येडूलकर, युनायटेड वे बेंगलुरू प्रतीनिधी, समाज विकास विभागाकडील अधिकारी व कर्मचारी, श्री. धर्मेंद्र सातव, राज्य अध्यक्ष, प्रहार संघटना, दिव्यांग नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये मा. नवल किशोर राम, महापालिका आयुक्त, यांनी दिव्यांगांमध्ये कोणतीही कमतरता नसते तर व्यवस्थेमध्ये कमतरता असतात, असे मत व्यक्त केले. त्यामुळे दिव्यांगाना दैनंदिन जीवन सुखकर होण्यासाठी त्यांना आवश्यक असलेल्या भौतिक सुविधा निर्माण करून देण्याची बाब लक्षात आणून दिली. पुणे महानगरपालिका दिव्यांगांसाठी विविध योजना राबवित असल्याचे तसेच पुणे महानगरपालिकेने शासनाच्या इतर विभागाच्या सहकार्याने दिव्यांगाना विविध कृत्रिम अवयव मोजमाप व वाटप कार्यक्रम घेतल्याची माहिती दिली.

मा. मंजुषा नागपुरे, महापौर, पुणे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून युनायटेड वे बेंगलुरू, Trestle Labs आणि इतर संस्थांचे दिव्यांगांसाठी केलेल्या कार्याबद्दल कौतुक केले. त्यांनी सांगितले की दिव्यांग व्यक्ती हा समाजाचा अविभाज्य भाग आहे आणि त्यांना वेगळे न पाहता त्यांच्या विशेष गरजांसाठी स्वतंत्र व्यवस्था आवश्यक आहे. यासाठी पुणे महानगरपालिकेत “दिव्यांग भवन” उभारण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. Neo Motion इलेक्ट्रिक व्हीलचेअर, स्मार्ट चष्मे आणि AI आधारित वाचन उपकरण यांसारख्या तंत्रज्ञानामुळे दिव्यांग व्यक्तींचे स्वावलंबन आणि रोजगाराच्या संधी वाढतील, असे त्यांनी नमूद केले. तसेच CSR उपक्रमांद्वारे योग्य लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचत असल्याचेही त्यांनी कौतुक केले. शेवटी, अधिक संस्था CSR माध्यमातून पुढे येऊन समाजोपयोगी उपक्रम राबवावेत, तसेच दिव्यांगांसाठी समावेशक आणि सुलभ व्यवस्था निर्माण करण्यासाठी सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमा नंतर दिव्यांगाना वाटप करण्यात आलेल्या साहित्या विषयी संस्थेमार्फत आवश्यक ते प्रशिक्षण देणेत आले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप आयुक्त, आशा राऊत यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्री. असंग पाटील, उप समाज विकास अधिकारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अलका जोशी यांनी केले.